आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार दिनांक १८ मे २०२५

<u>ठळक बातम्या</u>

1. कृषी संशोधन संस्थेच्या परस्पर समन्वयातून 'एक राष्ट्र एक शेती आणि एक संघ 'हे तत्त्व साकार होणार: केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांचं नागपुरात प्रतिपादन.

2. दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी नेमलेल्या सर्वपक्षीय प्रतिनिधी मंडळांचे दौरे जाहीर.

3. आत्मनिर्भर भारताच्या ताकदीची ऑपरेशन सिंदूरच्या यशातून प्रचिती- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं नागपूर जिल्ह्यातील तिरंगा यात्रेत प्रतिपादन.

4. निसर्गाचे जतन आणि संवर्धनासाठी गोरेवाडा परिसरातील प्रस्तावित बायोडायव्हर्सिटी पार्क उत्तम माध्यम ठरेल- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास.

<u>केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंग चौहान</u>

कृषी संशोधनासाठी कार्यरत असणाऱ्या भारतीय कृषी संशोधन परिषद- आयसीएआर'च्या संशोधन संस्था यांच्या परस्पर समन्वयातून 'एक राष्ट्र एक शेती आणि एक संघ 'हे तत्त्व साकार होणार असून कृषी समृद्धीच्या संदर्भात केंद्र सरकार राज्य शासनासोबत कार्यरत राहील, असे प्रतिपादन केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी आज नागपूर मध्ये केले. कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित 'विकसित कृषी संकल्प अभियाना' अंतर्गत कृषी संवाद या कार्यक्रमांमध्ये ते विदर्भातील शेतकऱ्यांशी संवाद साधत होते......

*आज हम यहाँ से ऐलान कर रहे हैं एक देश, एक राष्ट्र, एक कृषि और एक टीम का । इस कार्यक्रम के बाद आपके साथ बैठके महाराष्ट्र के कृषि के विकास का रोड मैप बनाएगी। जो अच्छे काम चल रहे हैं, उनको आगे बढ़ाते हुए हम महाराष्ट्र के लिए, विदर्भ के लिए और क्या बेहतर कर सकते हैं । आपको पता है 16 हजार वैज्ञानिक है हमारे पास, लेकिन वैज्ञानिक शोध करते लैब में और किसान काम करता है खेत में, हमारी कोशिश है कि वैज्ञानिक को किसानों से जोड़के हम प्रयोगशाला और खेत को एक कर दें ताकि पूरा लाभ रिसर्च, शोध और अनुसंधान का मिले।*

याप्रसंगी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे कृषी मंत्री ॲड.माणिक कोकाटे, भारतीय कृषी संशोधन परिषदेचे महासंचालक डॉ.एम.एल.जाट प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी चौहान यांनी माहिती देताना सांगितलं की आयसीएआरच्या देशभरात 113 संस्था असून त्यातील 11 संस्था महाराष्ट्रात असून, नागपुरातील मृदा सर्वेक्षण संस्था- एनबीएसएसएलयूपी येथे या सर्व संस्थेच्या प्रमुखांसोबत आपण बैठक घेणार असून महाराष्ट्रातील कृषी विकासाची दिशा या बैठकीतून साध्य होणार आहे. प्रयोगशाळा आणि जमीन यांच्यातील दरी कमी करण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे. देशभरामध्ये आयसीएआर संस्थेचे 16,000 कृषी वैज्ञानिक असून आयसीएआरचे शास्त्रज्ञ कृषी विस्तार अधिकाऱ्यांसह एक टीम म्हणून गावांना भेट देतील

आणि शेतकऱ्यांना नवीन प्रकारच्या बियाण्यांबद्दल आणि शेतीतील नवोपक्रमांबद्दल शिक्षित करतील. येत्या 29 मे ते 12 जून या पंधरा दिवसाच्या अभियानामध्ये खरीप हंगामाच्या नियोजनाकरिता कृषी वैज्ञानिक गावांना भेटी देतील आणि शेतकऱ्यांना शाश्वत शेती बद्दल मार्गदर्शन करतील, असे त्यांनी सांगितले. एनबीएसएसएलयूपीने हायपर स्प्रेक्टल सेंसर तंत्रज्ञानाचा वापर करून देशातील विविध विभागांची मातीची सामू (पीएच), घनता तसेच मूलद्रव्यांची स्पेक्टोरेडिओ मिटरद्वारे संकलित केलेल्या माहितीचा समावेश असलेल्या 'नॅशनल सॉईल स्पेक्ट्रम स्पेक्ट्रल लायब्ररीचे उद्घाटन कृषी मंत्री चौहान यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत केले. या तंत्रज्ञानाच्या उद्घाटनासोबतच, महाराष्ट्र मृदा नकाशा- सॉईल मॅप असलेले पहिले राज्य बनले आहे. कापसाच्या पिकांवर पडणाऱ्या गुलाबी बोंडअळीच्या कीड व्यवस्थापनाकरीता AI-आधारित स्मार्ट ट्रॅप तंत्रज्ञानाचा देखील प्रारंभ याप्रसंगी चौहान यांनी केला. हे तंत्र शेतकऱ्यांना संक्रमित पिकांबद्दल अलर्ट पाठवेल. याप्रसंगी नैसर्गिक शेती, सेंद्रिय शेती तसेच शेतकरी उत्पादक संघ यामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नागपूर विभागातील शेतकऱ्यांचा सत्कार कृषी मंत्री आणि मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाला नागपूर विभागातून आलेले शेतकरी, कृषी अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्वपक्षीय प्रतिनिधिमंडळं

दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत, सात सर्वपक्षीय प्रतिनिधिमंडळं लवकरच वेगवेगळया देशांना भेट देणार आहेत. या संदर्भात, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी या शिष्टमंडळांचं नेतृत्व करणाऱ्या खासदारांची आणि सदस्यांची यादी जाहीर केली आहे. त्यानुसार, शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालचा गट युएई, लायबेरिया, काँगो आणि सिएरा लिओनला भेट देईल. राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालचा गट इजिप्त, कतार, इथिओपिया आणि दक्षिण आफ्रिकेला भेट देईल. रविशंकर प्रसाद यांच्या नेतृत्वाखाली यूके, फ्रान्स, जर्मनी, युरोपियन युनियन, इटली आणि डेन्मार्कला भेट देणाऱ्या गटात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या प्रियंका चतुर्वेदी यांचा समावेश आहे. काँग्रेसचे शशी थरूर यांच्या नेतृत्वाखालचा गट अमेरिका, पनामा, गयाना, ब्राझील आणि कोलंबियाला भेट देणार असून त्यात शिवसेनेचे मिलिंद देवरा यांचा समावेश आहे.

बनावट याद्या

सोशल मीडियावर 'भाजपा जिल्हाध्यक्ष 2025' या नावाने फिरणारी 81 जिल्हाध्यक्षांची यादी बनावट असून, तिचा पक्षाशी कोणताही संबंध नाही, अशी माहिती भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी अधिकृत निवेदनाद्वारे दिली आहे. आतापर्यंत भाजपाच्या फक्त 58 जिल्हाध्यक्षांची नियुक्ती अधिकृतरित्या जाहीर करण्यात आली आहे. उर्वरित जिल्ह्यांची निवड प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे बनावट यादीवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन चव्हाण यांनी केले आहे.

तिरंगा यात्रा

ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ देशभरात तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत. नागपूर जिल्ह्यात सावनेर इथं निघालेल्या तिरंगा यात्रेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सहभागी झाले होते. आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया अंतर्गत निर्मित शस्त्रास्त्रांमुळं पाकिस्तान विरुद्धच्या युद्धात आपण विजयश्री प्राप्त केली. या शस्त्रास्त्रांसाठी जगातून भारताकडे मागणी होत आहे, असं फडणवीस यांनी वार्ताहरांशी संवाद साधताना सांगितलं....

*आज भारताची जी डिफेन्स कॅपेबिलिटी आहे ती पाकिस्तानच्या पाच पट जास्त आहे. आपला जो वॉर डॉमिनन्स आहे या संपूर्ण युद्धामध्ये जो आपल्याला पाहायला मिळाला, ऑपरेशनमध्ये जो आपल्याला पाहायला मिळाला हा वॉर डॉमिनन्स 'आत्मनिर्भर भारत' आणि 'मेक इन इंडिया' अशा प्रकारच्या शस्त्रामुळे आपण करू शकलो. आपल्या सगळयाच डिफेन्स केपेबिलिटीची मागणी आता जग करत आहे.*

नागपुरात भाजपचे प्रदेशाध्यक्ष आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वात सिंदूर सन्मान तिरंगा यात्रा काढण्यात आली. यात्रेत ५०० फूट लांबीचा तिरंगा ठेवण्यात आलेला होता. ही भाजपची राजकीय यात्रा नाही, सर्वजण भारतीय सैन्यासोबत आहेत. भारतीय सैन्याच्या समर्थनार्थ आणि दहशतवादाविरुद्ध देशाची एकता दाखवण्यासाठी, ही भव्य तिरंगा यात्रा आयोजित केली असल्याचं यावेळी बावनकुळे म्हणाले.

*मोठी तिरंगा यात्रा या ठिकाणी सर्वसामान्य जनतेची हि यात्रा कुणा पक्षाची नाही आहे सर्वसामान्य जनतेची आहे आणि मला विश्वास आहे, की भारतीय सेनेच्या मागे देश उभा आहे. भारतीय सेनेच्या माग भारताची जनता उभी आहे. मोदी यांच्या माग जनता उभी आहे. म्हणून हि तिरंगा यात्रा संपूर्ण देशभर, महाराष्ट्रभर आणि अत्यंत उत्साहाने निघत आहे. नागपूरची यात्रा हि ऐतिहासिक आहे. या यात्रेमध्ये हजारो लोक सहभागी झालेले आहेत. आमचे वीर माजी सैनिक उपस्थित झालेले आहेत आणि यात्रेच्या माध्यमातून आमचं संपूर्ण समर्थन दहशदवाद्यांना बिमोड करण्याकरता घेतलेल्या मोदींच्या निर्णयाच्या पाठीशी आहे.*

वाशिम येथीही सकाळी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून तिरंगा यात्रा काढण्यात आली. ही तिरंगा यात्रा पाटनी चौक, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे अकोला नाका इथल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयाला पुष्पहार अर्पण करून विसर्जित झाली.

जैवविविधता पार्क

निसर्गाचे जतन आणि संवर्धन ही भावना समाजाच्या प्रत्येक घटकात रुजण्यासाठी निसर्गाच्या माध्यमातून लोकांना कृतिशील संदेश देणे आवश्यक आहे. यासाठी गोरेवाडा परिसरातील प्रस्तावित बायोडायव्हर्सिटी पार्क एक उत्तम माध्यम ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. नागपूर येथील गोरेवाडा परिसरात सुमारे 3 लाख चौरस मीटर क्षेत्रावर हा पार्क साकारण्याबाबत प्राथमिक आढावा बैठक मुख्यमंत्री यांच्या रामगिरी या शासकीय निवासस्थानी काल संपन्न झाली. या जैवविविधता पार्कमध्ये सुमारे

दीडशे पेक्षा अधिक बांबूच्या जातींचे संवर्धन केले जाईल. देवराई वन, नक्षत्र वन, राशी वन, औषधी वनस्पती संशोधन आणि संवर्धन, फुलपाखरू आणि काजवे असलेलं वन, विविध माती प्रकारांचे वैविध्य जपणारं दालन, पर्जन्यमापन, दिशा शास्त्र, योगा झोन, पीस झोन, फॅमिली झोन, मानसशास्त्र, आरोग्य या प्रमुख घटकांचा अंतर्भाव असणारा हा पार्क राहील.

<u>प्रकाशन सोहळा</u>

प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराजांची ग्रंथसंपदा अपार आहे. त्यापैकी काही ग्रंथांची मागणी मोठया प्रमाणात आहे. त्यांच्या पुनर्मुद्रणासाठी माधान इथल्या श्री संत गुलाबराव महाराज संस्थानच्या पदाधिकाऱ्यांचे प्रयत्न सुरू होते. महाराजांच्या चरित्रासह त्यांच्या एकूण पाच पुस्तकांचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या पुढाकाराने यशस्वीरीत्या पुनर्मुद्रण करण्यात आले आहे. या ग्रंथांचा प्रकाशन सोहळा महाराजांचे अनुयायी आणि त्यांच्या कार्यावर संशोधन करणारे विद्वज्जन यांच्या उपस्थितीत दुसऱ्या माळ्यावरील सभागृह, एनरिको हाईट्स, हॉटेल रॅडिसन ब्लूच्या शेजारी, वर्धा रोड, नागपूर येथे आज सायंकाळी ६.३० वाजता होईल, असे श्री संत गुलाबराव महाराज संस्थान, माधान, जि. अमरावती यांच्या वतीने कळविण्यात आले आहे.

<u>हवामान</u>

हवामान! येत्या काही तासांमध्ये चंद्रपूर, नागपूर, वर्धा, यवतमाळ, गोंदिया तसेच पश्चिम विदर्भातील अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशिम जिल्ह्याच्या तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली असून आज संध्याकाळपासूनच नागपूरचे हवामान ढगाळ आहे. सर्वात जास्त तापमानाची नोंद भंडारा येथे 44 पूर्णांक 2 दशांश अंश सेल्सियस करण्यात आली आहे.

******